आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे | अंक चवथा | पृष्ठे १३ | एप्रिल २०२३ | www.parlekar.com


या अंकात


पान ०३ पार्ले ज्ञात अज्ञात - एक परिचय
पान ०४ नवनवीन क्षितिजांच्या शोधात
पान ०६ ना तो कारवांकी तलाश है
पान ०९ केमाक्ली आणि इजिप्तमधील ख्रिश्चानिटी



पान ११


**'सूप्स आणि सॅलड्सची'- वाट आरोग्याची**

ईशान आंबर्डेकर




Registered-RNI no. 54781/92


## लोकमान्य सेवा संघ, पारले

# शताब्दी महोत्सवाचा भव्य समारोप

पारल्याच्या संस्कृतीचे प्रतीक असणारी पितृतुल्य संस्था 'लोकमान्य सेवा संघ पार्ले' म्हणजेच टिळक मंदिराच्या शताब्दी महोत्सवाचा सांगता समारंभ दिनांक २२ मार्च २०२३ रोजी म्हणजे गुढीपाडव्या दिवशी साजरा झाला. संध्याकाळी पाच ते आठ या वेळेत 'शताब्दी लोकमान्य सेवा संघाची-शताब्दी सांस्कृतिक पार्ल्याची' अशी संकल्पना घेऊन स्फूर्ती यात्रा काढण्यात आली. पार्ल्यातील ६३ सामाजिक संस्थानी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकमान्य सेवा संघाच्या विविध शाखांच्या कार्याचा गौरव केला तसेच शतक महोत्सवी स्मरणिकेचे विमोचन केले. उपमुख्यमंत्री फडणवीस ह्यांनी लोकमान्य सेवा संघाच्या १०० वर्षांच्या कारकिर्दीचा गौरव करताना संघाचे अध्यक्ष मुकुंदराव चितळे ह्यांनी पार्ल्यात कला दालन उभारावे ह्या विनंतीचा शासन नक्कीच विचार करेल असे आश्वासन दिले तसेच ह्या कार्यक्रमाला खासदार पूनम महाजन, स्थानिक




आमदार पराग अळवणी, पालकमंत्री मंगल प्रभात लोढा तसेच माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत आणि आमदार आशिष शेलार यांची उपस्थिती होती .





+91 77388 66111 | sales@atharvlifestyle.com | Atharv House, Nariman Road, Vile Parle East, Mumbai - 400057.

## संपादकीय

पार्ल्याच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व सुरक्षित वातावरणामुळे तसेच स्टेशन व एअरपोर्ट यांना जवळ असणाऱ्या त्याच्या विशिष्ठ स्थानामुळे अनेक मराठी आणि अमराठी कुटुंबांना पार्ल्यात यावेसे वाटते. येथे अनेक सहनिवासांचा पुनर्विकास होत असून पार्ल्याची लोकसंख्या व पर्यायाने रस्त्यावरील गर्दी दिवसेंदिवस वाढतच जात आहे. 'आपण एका पार्ल्याच्या डोक्यावर दुसरे पार्ले वसवत आहोत' असे मी नेहमी गमतीने म्हणतो आणि ते खरेही आहे.

वाढत्या गर्दीमुळे पार्ल्याच्या सर्वच नागरी सुविधांवर कमालीचा ताण पडत आहे, भविष्यात जास्तच पडणार आहे. पाणी पुरवठा, स्वच्छता, वाहतुक व पार्किंग, ह्या सर्वच गोष्टीतील गोंधळ हळूहळू वाढत चालला आहे. वाहतूक समस्या तर दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत चालली आहे. रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढतच चालली आहे.(त्या प्रमाणात लोकांचा ट्रॅफिक सेन्स मात्र वाढत नाहीये) दोन्ही फूटपाथ वर अनधिकृत फेरीवाले, दुतर्फा पार्क केलेली वाहने व उरलेल्या भागातून माणसे आणि गाड्या यांची ये जा. संध्याकाळी पार्ल्यात फिरावेसे वाटत नाही. जेष्ठ लोकांना तर रस्त्यावरून चालणेच कठीण होऊन बसले आहे. उभे आयुष्य पार्ल्यात काढलेली अनेक कुटुंबे आज केवळ गर्दीच्या कारणामुळे पार्ले सोडून जाण्याचा विचार करत आहेत.

यावर काहीच उपाय नाही का? नक्कीच आहे. आम्हाला सुचणारे काही उपाय असे : १. सर्व रस्त्यांवर सम-विषम तारखांनुसार एकाच बाजूला पार्किंग करावे. २. महत्वाच्या रस्त्यांवर (महात्मा गांधी, हनुमान, नेहरू) वाहनांसाठी नेहमी No Parking व गर्दीच्या वेळी No Stopping असावे. ३. अनाधिवृत्त फेरीवाल्यांवर कारवाई करावी. लोकांनाच चालायला जागा नाही तर यांना का म्हणून द्यावी? ४. Traffic Flow चा योग्य अभ्यास करून काही रस्ते One Way घोषित करावेत.

आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ह्या सर्व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, नाही तर मुंबईच्या सांस्कृतिक राजधानीला वाहतूक कोंडीची राजधानी म्हणायची पाळी येईल!

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
अवंती मांडवकर
सलोनी पाटील

editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

## लोकमान्य सेवा संघ, पारले - शताब्दी महोत्सव


१० मार्च रोजी शताब्दी महोत्सवनिमित्ताने माजी खासदार, वक्ते तसेच भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ.विनय सहस्त्रबुद्धे यांनी पार्लेकरांशी संवाद साधला


११ मार्च रोजी कौशल इनामदार यांनी दिपक करंजीकर यांच्या संकल्पनेतील 'शतस्वर' हा कार्यक्रम सादर केला तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे होते.


१२ मार्च रोजी 'संगीत संध्या' हा कार्यक्रम पार पडला तसेच या कार्यक्रमात बेला शेंडे या सादरकर्त्या होत्या.


१३ मार्च रोजी संस्थेचे कार्योपाध्यक्ष यांनी Zee Marathi वरील 'लोकमान्य' या लोकप्रिय मालिकेतील कलाकारांसोबत गप्पा मारल्या


१४ मार्च रोजी MD & CEO of NSE आशीष चौहान यांनी 'Technology Evolution In India Stock Market 1857 to 2023' या विषया निगडित माहिती दिली.


१५ मार्च रोजी 'रेरा-महारेराचा फेरा' या कार्यक्रमात शुहदा चौकार यांनी शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत) यांची मुलाखत घेतली.


१६ मार्च रोजी अष्टपैलू कलाकार मिलिंद गुणाजी यांची मुलाखत चित्रा वाघ यांनी घेतली.


१७ मार्च रोजी नृत्यांगना सोनिया परचुरे यांच्या संकल्पनेतून 'परिणत कवण जन्माला-एक नृत्यविषकार' सादर झाले.


१८ मार्च रोजी 'सामाजिक संस्था भविष्यातील वाटचाल' या विषयावर पूनमताई महाजन यांनी भाषण दिले.


१९ मार्च रोजी 'टिळक पर्व' या विषयावर विकास यांनी ख्यातनाम लेखक अरविंद गोखले यांची मुलाखत घेतली.


२० मार्च रोजी 'मन करा रे प्रसन्न' या विषयाचे सादरकर्ते डॉ. संजय उपाध्ये यांचे स्वागत संस्थेचे कार्यवाह महेश काळे यांनी केले.



२१ मार्च रोजी 'कलात्मक मनाचे कवडसे' या कार्यक्रमात अंबरीश मिश्र यांनी मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्याशी दिलखुलास गप्पा मारल्या.


२२ मार्च रोजी म्हणजेच गुढीपाडव्याच्या दिवसी स्फूर्ती यात्रेचे आयोजन केले होते, तसेच प्रमुख पाहुणे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

# पार्ले ज्ञात अज्ञात - एक परिचय

हजारो वर्षांपूर्वीच्या साष्टी बेटावरचं पार्ले गाव कसं असेल याचं कुतूहल, एकोणिसाव्या शतकातल्या त्याच्या स्वरूपाचा शोध, विसाव्या शतकातील पार्ल्याविषयीचा आदर आणि एकविसाव्या शतकात त्याच्या मूळ खूणा जपण्याची तळमळ या सर्व वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असं संग्राह्य पुस्तक म्हणजे संदीप दहिसरकर लिखित 'पारले: ज्ञात-अज्ञात'!

करिअरच्या वेगळ्या वाटा धुंडाळणाऱ्या पार्ल्यातील युवावर्गाचा प्रतिनिधी म्हणून संदीप दहिसरकर हे नाव निश्चितच आश्वासक आहे. पुरातत्त्वशास्त्र आणि इतिहास या विषयांच्या अभ्यासाला लेखन आणि संशोधनाची जोड देत त्याने पार्लेकरांसाठी या संग्राह्य पुस्तकाची भेट आणली आहे.




सध्याचे पार्ल्याचे रूप ज्या झपाट्याने बदलत आहे त्याने तर अस्सल पार्लेकर सुद्धा भांबावून गेले आहेत. इथल्या जुन्या वास्तू, छोट्या गल्ल्या, एकमजली कौलारू घरं, घरांभोवतीचे बगीचे, फुलझाडं हे तर याआधीच दुर्मीळ झालं होतं. पण चार-पाच दशकांपूर्वी उभ्या राहिलेल्या दुमजली इमारतीदेखील एकेक करून पुनर्विकासाच्या लाटेत हरवून जात आहेत. त्यांच्या जागी उंच आणि सुसज्ज इमारती दिमाखाने उभ्या राहात आहेत.

पुस्तकातील मनोगतात लेखक म्हणतो की, पारले हे मला दर शंभर वर्षांनंतर राखेतून नवा जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्षाप्रमाणे भासत आहे. पक्षी तोच.. शरीर वेगळे! हे निरीक्षण अगदी खरे आहे. त्या पक्ष्याचा आत्मा म्हणजे केवळ इथल्या वास्तूच नव्हे तर पार्ल्याला स्वत:ची ओळख मिळवून देणारी, इथल्या मातीत रूजलेली संस्कृतीदेखील आहे याचे भान लेखकाला आहे. त्यामुळेच कला, साहित्य, शिक्षण अशा सर्व क्षेत्रातील प्रगतीच्या पाऊलखुणा शोधण्याचा आणि जुन्या पिढीतील जाणत्या, द्रष्ट्या पार्लेकरांच्या कार्याची योग्य दखल घेण्याचा स्तुत्य प्रयत्न लेखकाने केलेला दिसतो.

पार्ले परिसराचा प्राचीन संदर्भ शोधत तब्बल बाराशे वर्षांपूर्वीच्या ऐतिहासिक नोंदीचे तपशील वाचकांना इथे दिसतात. त्यात अनेक महत्त्वाची पत्रे, नकाशे, सरकारी नोंदी, नगर नियोजन आराखडे अशा दुर्मीळ दस्तावेजांचाही समावेश आहे. त्यामुळे साहजिकच पुस्तकातील सर्व माहितीला विश्वासार्हता मिळाली आहे. उदा. १९३१ साली झालेल्या मीठाच्या सत्याग्रहाच्या वेळी विलेपार्ले ही महाराष्ट्राची मुख्य छावणी होती. जमनालाल बजाज हे त्याचे प्रमुख होते. जुहूच्या समुद्रकिनाऱ्यावर मीठाच्या सत्याग्रहासाठी मोठा जमाव गोळा झाला होता. तेव्हा अनेक नेत्यांना अटक झाली होती अशा महत्त्वाच्या नोंदी या पुस्तकात सापडतात.

जुहू परिसराच्या प्राचीन इतिहासाच्या अनुषंगाने तेथील वैशिष्ट्यपूर्ण वास्तू तसेच पूर्वापार स्थायिक झालेल्या राणे वंशाची सविस्तर माहिती इथे दिलेली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आलेल्या प्लेगच्या साथीमध्ये शुद्ध हवा आणि पाण्यासाठी दक्षिण मुंबईमधून काही कुटुंबे पार्ल्यात स्थलांतरित झाली. शेठ गोवर्धनदास तेजपाल हे त्यांपैकी महत्त्वाचे नाव. त्यांच्यावरील लेखाच्या निमित्ताने पूर्व पार्ल्याच्या वसाहतीच्या स्थापनेपासूनच्या अनेक बाबी वाचायला मिळतात.

राज्यातील एका महत्त्वाच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्राचा मान पार्ल्याला मिळवून देण्यात लोकमान्य सेवा संघ आणि पार्ले टिळक विद्यालय यांचा प्रमुख वाटा आहे. या दोन्हींचा सविस्तर आणि सचित्र परिचय पुस्तकात



करून दिला गेला आहे. यात लोकमान्य सेवा संघातल्या सुप्रसिद्ध स्वराज्य त्रिमूर्ती' व पहिल्या सार्वनजिक गणेशोत्सवाची माहिती देणारे लेख विशेष उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे पार्ल्याचे नाव सर्वत्र झळकवणाऱ्या पार्ले-जी बिस्किटांच्या निर्मितीचा इतिहासही रंजक आहे.

सुप्रसिद्ध शिल्पकार रावबहादुर गणपतराव म्हात्रे यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखीत करणारे दोन अभ्यासपूर्ण लेख या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहेत. म्हात्रे यांच्याविषयीचा आदर, त्यांच्या कार्याविषयीचे संशोधन आणि ते योग्य स्वरूपात लोकांसमोर यावं ही तळमळ, या सर्वाचा परिपाक या लेखांमध्ये दिसतो. देशातल्या अनेक मोठ्या चित्रकारांना घडवणारे केतकर मास्तर आणि त्यांच्या केतकर्स आर्ट इंस्टिट्यूटविषयीच्या माहितीपूर्ण लेखातून बऱ्याच नवीन गोष्टी समजतात. पार्ल्यात ज्यांची खऱ्या अर्थाने जडणघडण झाली, त्या महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाचं अर्थात पु.ल.देशपांडे यांच पार्ल्याशी असलेलं घनिष्ट नातं अधोरेखित करणारा डॉ. समिरा गुजर जोशी यांचा लेखही वाचनीय आहे.

पार्ल्याच्या काही वास्तू अजूनही जुन्या काळाच्या वैशिष्ट्यपूर्ण खूणा अंगाखांद्यावर बाळगत आहेत. त्यापैकी प्रल्हाद भुवन, चोक्सी भुवन, धुरंधर डॉक्टरांचे नानी निवास, रामदासाश्रम, सुंदर निवास, प्रभुघर त्याचप्रमाणे पार्ल्यातील जुनी देवालयं अशा अनेक वास्तूंचे सचित्र फोटो त्यांच्या स्थापत्यशैलीच्या वैशिष्ट्यांसह इथे दिसतात. पार्ल्याचे बदलते स्वरूप दाखवणारे, खऱ्या अर्थाने प्रकाशचित्रांनी सजलेलं असं हे देखणंपुस्तक आहे. छायाचित्रकार चेतन चोणकर यांचे कामही उत्तम झाले आहे.

रंजक माहिती, भरपूर फोटो आणि उत्कृष्ट निर्मितीमूल्य असलेलं हे पुस्तक पार्ल्याचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येकाच्या संग्रही असायलाच हवं.

पार्ल्याला सुसंस्कृत मध्यमवर्गीय रूप देणाऱ्या विष्णुपंत आणि बाबुराव परांजपे यांचा समावेश दस्तावेजातील पत्रांमध्ये असला तरी या पितापुत्रांवरील सविस्तर लेखाची उणीव मात्र जाणवली. त्या लेखासहित पार्ल्याचा गेल्या पन्नास-साठ वर्षांचा आढावा घेणारा पुढील भागही लवकरच प्रकाशित व्हावा यासाठी दहिसरकर यांना मन:पूर्वक शुभेच्छा! ..



चित्रा वाघ
९८२११ १६९३६

## भाऊ तोरसेकरांच्या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

मंगलाबाई भागवत फाऊंडेशन ही संस्था शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य अशा अनेक स्तरांवर कार्यरत आहे. त्याचबरोबर गरजेनुसार अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवणारी संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून विश्वस्त चैतन्य भागवत व ॲड. वीणा भागवत अनेक वर्षे सातत्याने थोर विचारवंतांची व्याख्याने आयोजित करीत आहेत. कोरोना काळानंतर पहिल्यांदाच रविवार दिनांक २६ मार्च रोजी सुप्रसिध्द पत्रकार व राजकीय विश्लेषक भाऊ




तोरसेकर यांचे 'महाराष्ट्रातील सत्तांतर की स्थित्यंतर' या विषयावरील भाषणाने या उपक्रमास पुन:श्च सुरुवात झाली.

आपल्या भाषणात भाऊंनी ''सत्तांतर व स्थित्यंतर यातला नेमका फरक सोदाहरणसकट स्पष्ट केला.'' सत्तांतरे होत असतात, स्थित्यंतरे घडवावी लागतात. जे नेते वा पक्ष जनसामान्यांसाठी सकारात्मक स्थित्यंतरे घडवून आणतात वा त्या दिशेने नेटाने प्रयत्न करतात, त्यांना जनादेश खचितच लाभतो. जनतेशी वा समाज प्रवर्तक निकडीच्या गोष्टींशी नाळ तुटली की ते लादलेले सत्तांतर अल्पायुषी असते हे अलीकडच्या ताज्या घटनांनी अधोरेखीत केले आहेह्न असे त्यांनी प्रतिपादन केले. भाऊंनी आपल्या खुमासदार भाषणात आयुष्यात आलेल्या अनेक अनुभवांचे कथन केले. या व्याख्यानाला पाचशेहून अधिक श्रोते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया पिंगे ह्यांनी केले तसेच ॲड. वीणा भागवत यांनी सर्वांचे आभार मानले आणि सांगता राधा पेठे यांनी पसायदानाने केली. संस्थेच्या कार्याबद्दलची सविस्तर माहिती www.bhagwatfoundation.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

# नवनवीन क्षितिजांच्या शोधात

गेल्या दहा वर्षात विलेपार्ल्याचे रुप अतिशय वेगाने बदलत चालले आहे. जुन्या इमारती, घरे, बंगले यांची जागा सात-आठ मजली टॉवरनी घेतली आहे. सध्या पार्ल्यात सहज एक फेरी टाकली तरी पाच-पन्नास इमारतींचे पुर्ननिर्माण चालू असताना दिसते. बदलत्या स्वरूपात, बदलत्या अडचणीवर मात करण्यासाठी आधुनिक यंत्रणा बसवल्या जात आहेत. एअरपोर्ट जवळची व सुशिक्षित उच्चभ्रू वस्ती, घरांचे वाढलेले आकारमान व कमी झालेली व्यक्ती संख्या. यामुळे सर्वकडे संगणक, नेटवर्किंग, सीसीटीव्ही कॅमेरे, फायर फायटिंग सिस्टिम्स, मेटल डिटेक्टर, व्हिडिओ डोर फोन्स आदींची वाढती गरज व या सगळ्यांसाठी पार्लेकरांपुढे पहिले पसंतीचे



नाव येते ते 'शार्गी' व मुकेश शिपुरकरांचे.

पार्ल्यातील तेव्हाच्या मध्यमवर्गीयांप्रमाणेच दोन खोल्यात आई-वडील, दोन बहिणी, येणारे पाहुणेरावणे यात वाढलेले व पार्ले टिळकमधून शिकलेले मुकेश यांच्यावर पार्ल्याच्या सांस्कृतिक सामाजिक संस्कारांचा पगडा होताच. वडील शरद शिपुरकर सेंट्रल एक्साईज मधून अत्यंत प्रामाणिक असिस्टंट कमिशनर म्हणून निवृत्त झालेले, तर आई गीता या महानगरपालिकेच्या शिक्षण खात्यात दोन वेळा महापौर पुरस्काराने सन्मानित झालेल्या उच्च अधिकारी. मुलाने उत्तम शिक्षण घेऊन चांगली नोकरी करावी ही वडिलांची इच्छा. त्यामुळे मुकेश यांनी प्रथम डहाणूकरला कॉमर्सला प्रवेश घेतला. पण त्यांची भोसला मिलिटरीत निवड झाली. म्हणून ते तिथे गेले. पण घरगुती कारणांमुळे ते सोडून परत आई-वडिलांकडे यावे लागले. आता नीट शिक्षण हवे म्हणून घरची परिस्थिती सांभाळतच त्यांनी भारती विद्यापीठातून इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स व भागुबाई मफतलाल मधून कॉम्प्युटर इंजीनियरिंगचा डिप्लोमा केला पुढे वडिलांच्या आग्रहामुळे कॉम्प्युटर इंजीनियरिंगची पदवी घेतली तसेच सोनी ऑरसन व सिस्टोनिक या कंपन्यांमध्ये नोकरीही केली.

पण स्वतःचा व्यवसाय करण्याची उर्मी स्वस्थ बसू देत नव्हती. सुरुवातीच्या काळात आपल्या मित्राच्या साथीने आयसी - कपॅसिटर असे इलेक्ट्रॉनिक्स पार्टस विकायला सुरुवात केली. याच काळात कॉम्प्युटरने भारतात पाय रोवायला सुरुवात केली होती. नामवंत आय. डी.एम. सारख्या कंपन्या अव्वाच्या सव्वा भावाने पीसी विकत होत्या. अशावेळी मुकेश यांनी एन बी देसाई या वडिलांच्या चार्टर्ड अकाउंटंट मित्राला निम्म्याहून कमी पैशात पीसी बनवून दिला व शार्गी कम्प्युटर्सचा (Sharad + Geeta) जन्म झाला. चार-पाच वर्ष स्वतःच पीसी बनवणे, गिऱ्हाईक शोधणे, डिलिव्हरी देणे व त्याचवेळी वडिलांची आजारपणात सेवा करणे अशी तारेवरची कसरत त्यांनी केली.



१९९५ मध्ये नम्रता यांच्याशी विवाहबद्ध होताना त्यांची संसारिक जबाबदारी नक्कीच वाढली. पण बी.न.पी. पारिबास फ्रेंच बॅक मध्ये नोकरी करणाऱ्या नम्रता यांनी घराची एक आर्थिक बाजू भक्कमपणे आजतागायत सांभाळली. म्हणूनच मुकेश यांना नवनवीन आव्हानांना पेलवणे सोपे झाले. महंत रोडवरील उषा निकेतन मध्ये एका खोलीत सुरू केलेला शार्गीचा संसार ३३ वर्षात कुठल्या कुठे जाऊन पोहोचला पण उषा निकेतनशी आपले भावनिक नाते कायम ठेवत आज पुनर्विकासित इमारतीमध्ये अनेक सदनिका मुकेश यांच्या आहेत. दहा हजाराहून जास्त पीसी, लॅपटॉप, यांची निर्मिती व पुरवठा करतानाच इंटेल, मायक्रोसॉफ्ट, एपसन, आयबीएम, कॉम्पॅक, सोनी, एचपी, सॅमसंग अशा सर्व हार्डवेअर कंपन्यांची डीलरशिप त्यांनी मिळवलीच. पण इन्फिनोवा, पेलको, बॉश, पॅनासोनीक हिकवीजन, फॅक अशा सीसीटीव्ही, इलेक्ट्रॉनिक सेक्युरिटी प्रॉडक्ट बनवणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांची डीलरशिपही त्यांनी मिळवली. या व्यवसायात स्वतःचा संगणक व सीसीटीव्ही पुरवठादार म्हणून दबदबा निर्माण केला. राजकीय, राष्ट्रीय स्तरावर हे काम करताना मिळालेल्या असंख्य आंतरराष्ट्रीय

पान ५ वर




पान ४ वरून **नवनवीन क्षितिजांच्या शोधात**

कंपन्यांच्या पुरस्कारांनी मुकेश यांच्या ऑफिसच्या भिंती भरून गेल्या.

काटेकोर, वक्तशीर व उत्तम सेवेमुळे व्यवसायाची भरभराट तर झालीच पण राज्य सरकारकडून उत्तम सेवेचा गौरव पुरस्कारही मिळाला. मंत्रालय, स्टॉक एक्सचेंज, मुंबई पोलीस, महाराष्ट्र पोलीस, ठाणे पोलीस, रेल्वे पोलीस, आर्मी हेडक्वार्टर, महत्वाचे शासकीय बंगले, अनेक शासकीय व व्यावसायिक कार्यालय,जम्मू-काश्मीर पोलिस, सुलझर, एस. आर.एस.,एस.पी. एम. सी. अशी त्यांच्या ग्राहकांची मोठी व जोखमीची यादी आहे. या सर्व यशातील पार्ल्याचे पाठबळ लक्षात ठेवून मुकेश यांनी अरविंद प्रभू तसेच सुदर्शन यांच्या सहाय्याने विलेपार्ल्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा स्वखर्चाने बसवून दिली. त्याचे उद्घाटन तेव्हाचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केले. या व्यवसायातील त्यांचे यश हे त्यांच्या चातुर्य, नेमके निर्णय घेण्याची क्षमता, धाडस, अथक परिश्रम, सतत पुढे झेप घेण्याचे वृत्ती यात सामावले आहे. त्याचप्रमाणे यशाचे दुसरे गमक आहे ते माणसं धरून ठेवण्याच्या वृत्ती. ज्यामुळे मित्र परिवार हा खूप मोठा आहेच पण त्यांचे त्यांच्या सहकारी वर्गाबरोबरही तितकेच सलोख्याचे संबंध आहेत. ज्यामुळे व्यवसायाच्या सुरुवातीपासूनचे सर्व सहकारी आजही त्यांचे खंदे मदतनीस झाले आहेत.



हे करत असताना मोठा मुलगा गौरीश याच्या अभिनयाच्या आवडी साठी त्याला पाठबळ देणे, शार्गी प्रॉडक्शन तर्फे छत्रपती संभाजी, जिजाबाई सारख्या टीव्ही मालिका व अर्धसत्य सारखे नाटक प्रेक्षकांना देणे असो वा टी ब्रेक, ग्रीन हाऊस सारखे रेस्टॉरंट बार चालवणे असो, लोणावळा व कोल्हापूर मधील रिसॉर्ट डेव्हलप करणे असो मुकेश प्रत्येकच व्यवसाय लीलया पेलताना दिसतात. ग्रीन हाऊस घेतल्यावर लगोलग आलेल्या करोनाचे संकट, त्या काळात स्टाफची घेतलेली काळजी व ती जागा पुनर्विकासात जाणार हे लक्षात येताच रेस्टॉरंट महंत रोड वरती हलवणे, असे अनेक धाडसी निर्णय तत्परतेने पण विचारपूर्वक घेणारे मुकेश शिपुरकर हे आज पार्ल्याच्या नव्या पिढीचे आदर्श बनले पाहिजेत. उत्तम गायक असलेले मुकेश ह्यांना पुढे गाणं हे केवळ हौस म्हणूनच जपता आलं. पण त्यांचा हा वारसा त्यांच्या दुसऱ्या मुलाने गौरवने पुढे नेला आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षी माननीय निवास खळे यांच्याकडून बक्षीस घेतलेल्या गौरवने गाणं तर जोपासलच. पण आई नम्रताकडून शिक्षणाचा वारसाही घेतला. मुकेश पटेल मधून कॉम्प्युटर इंजीनियरिंगचे शिक्षण घेतानाच संजीव ची मुलगी शुभदा दादरकर व पंडित सुरेश वाडकर यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे धडे ही गिरवले. गौरव यांनी वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी सी टी स टेक ह्या कंपनीत सीनियर सायंटिस्ट ही पोस्ट मिळवली. आता ते अलवाईन युनिव्हर्सिटी, सॅन फ्रान्सिस्को येथे एम. एस. साठी जायच्या तयारीत आहेत. तर मोठा गौरीश वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत शार्गी प्रोडक्शन व ग्रीन हाऊस उत्तमरीत्या सांभाळतो आहे. त्यानेही पृथ्वी थिएटर मध्ये चार वर्षे अभिनयाचे धडे गिरवत विजेता ह्या सुभाष घईंच्या सिनेमात उत्तम अभिनेता म्हणून स्वत:ला सिद्ध केले आहे. तर पत्नी नम्रता यांनी बी.एन.पी पारिबास फ्रेंच बँक मध्ये उच्चपदस्थ नोकरी सांभाळत स्वत:ची शैक्षणिक आवड जोपासली. त्यांनी एम कॉम, सीएआयपी पार्ट वन अँड टू, फ्रेंच भाषेच्या परीक्षा पूर्ण केल्या असून आता कायद्याचे शिक्षण घ्यायच्या विचारात आहेत. म्हणजेच शिपुरकरांच्या चारही शिखरांची चौ दिशांनी घोडदौड चालू आहे.

मुकेश शिपुरकर आजही स्वत:च्या ऑफिसमध्ये एकाच वेळी आपल्या सर्व व्यवसायांचा व समोर बसलेल्या वेगवेगळ्या कामांसाठी आलेल्या लोकांचा छान समतोल साधत असतात. आपल्या कर्तृत्वातून, चौकस सावधपणातून व अष्टदिशा आपल्या कर्तुत्वासाठी खुल्या करण्याची धमक ठेवल्यामुळे केवळ ३३ वर्षात त्यांची व्यवसायातील प्रगती केवळ कौतुकास्पद आहे. पार्लेकर युवकांसाठी असा चालता बोलता मार्गदर्शक नक्कीच फायद्याचा ठरावा.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०



# ना तो कारवांकी तलाश है....

संगीतकार रोशन नागरथ एका मध्यरात्री अत्यंत तृप्त मनाने घरी पोहोचले आणि अत्यंत उत्साहाने पत्नीला म्हणाले, आज मी बारा मिनिटांची कव्वाली रेकॉर्ड केली आहे. पत्नी अर्धवट झोपेत म्हणाली, बारा मिनिटं ? एवढी ऐकणार कोण ?? पण ती लोकांनी ऐकली.. नुसती ऐकली नाही, तर हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोत्कृष्ट कव्वाली म्हणून अजरामर झाली. गीतकार साहिर लुधियानवी यांनी लिहिलेली, संगीतकार रोशन यांनी संगीतबद्ध केलेली.. मन्ना डे, आशा भोसले,



सुधा मल्होत्रा, शिवदयाल बतिश, मोहम्मद रफी या कलाकारांनी गायलेली, बारा मिनिटांची..'नातो कारवांकी तलाश है'... ही कव्वाली हिंदी चित्रपटसृष्टीतील रेकॉर्ड आहे.

कव्वालांची घराणी, त्यांच्यातील स्पर्धा, हारजीत.. तसंच, उभरता शायर अमन हैदराबादी, त्याच्या शायरीवर प्रेम करणारी श्रीमंत घराण्यातील मुलगी शबनम, यांची प्रेम कहानी.. अशा दोन कथांचा मिळून बांधलेला 'बरसात की रात' हा दिग्दर्शक पी. एल. संतोषी यांचा चित्रपट..'गरजत बरसत'. या गौड मल्हारात सुरु होतो. वास्तविक पी. एल. संतोषी एवढ्या मोठ्या कव्वालीच्या विरोधात होते. त्यांना वाटलं कदाचित त्यामुळे चित्रपट पडेल. पण रोशन कव्वाली विषयात आग्रही होते. वस्तुस्थिती अशी आहे की मुख्यतः या कव्वालीमुळे चित्रपट चालला. नुसता चालला नाही तर, बॉक्स ऑफिसवर जबरदस्त हिट झाला.




वादळी रात्रीतल्या नायक नायिकेच्या ओझरत्या भेटीतून हा चित्रपट उभा राहतो म्हणून चित्रपटाचं नाव 'बरसात की रात'. अमानच्या शायरीवर प्रेमकरणारी शबनम. पण त्याच्या गरीबीमुळे तिच्या वडिलांचा लग्नाला विरोध. तशीच त्याच्या वर मूक प्रेम करणारी शमा. तिची अवखळ बहीण शबाब. शमा आणि शबाब या सुप्रसिद्ध कव्वाल मुबारक अली यांच्या मुली. दौलतखान गौस याच्या बरोबर कव्वाली मुकाबला हरल्यामुळे नाव..इज्जत..पैसा.. सगळं गेलेलं असतं. शायर अमान अली याच्याकडून काही नवीन शेर मिळाले तर नवीन उमेदीने पुन्हा कव्वाली मुकाबल्यात भाग घेता येईल, गेलेली शौहरत आणि दौलत पुन्हा हासिल करता येईल.. अशी ख्वाईश बाळगणारे मुबारक अली. शेवटच्या वीस मिनिटात कव्वाली मुकाबला. तेव्हा.. याचसाठी केला होता अट्टाहास.. अशी हीच ती ऐतिहासिक कव्वाली चित्रपटात येते. शेरोशायरी, कव्वाली हाच विषय असल्यामुळे चित्रपटात गझल आणि कव्वाली यांची रेलचेल आहे. रोशनजींच्या दमदार संगीतात नटलेल्या एकूण तीन कव्वाली आणि मैंने शायद तुम्हें, जिंदगीभर नहीं भूलेगी..अशा दोन अप्रतिम गझल आहेत. शिवाय इतर गाणी वेगळी. 'ना तो कारवां' या कव्वालीला जास्त प्रसिद्धी मिळाली. अन्य दोन.. जी चाहता है चूम लूं , निगाह-ए-नाझ के..तेवढ्याच उत्कृष्ट बांधल्या आहेत. त्यांचं चित्रीकरणही तेवढंच जबरदस्त आहे. रोशन साहेबांनी आपल्या बऱ्याच गाण्यांत सुधा मल्होत्रा यांचा आवाज वापरला आहे. इथे ही त्या आशाबाईंबरोबर गायल्या आहेत. कव्वालीसाठी अतिशय योग्य असा खणखणीत आणि गोड स्वर. पडद्यावरील गायक कलाकार, त्यांचे गातानाचे मुद्राभिनय, वाद्यांच्या वादनांचे अभिनय, टाळ्यांची साथ,



उत्साह, जरतारी पोशाख, रसिकांचा प्रतिसाद आणि मुख्य म्हणजे वातावरणातला जिवंतपणा, यामुळे सगळ्या कव्वाल्या नुसत्याच श्रवणीय नाहीत तर प्रेक्षणीय झाल्या आहेत.

'ना तो कारवां' या कव्वालीचे दोन भाग करता येतील. पहिला भाग म्हणजे पडद्यावर दौलतखान गौस झालेला कलाकार बलम आणि त्याला मन्ना डे यांचा खणखणीत स्वर. पाहताना हा कलाकार अभिनय करतो आहे असं वाटतच नाही. दौलतखांनाचा स्वतःच्या गाण्याबद्दलचा स्वाभिमान आणि अहंकार दोन्हीही उत्तम पेश केला आहे. हिंदुस्थानातील सर्वोच्च कव्वाल स्वतःच्या सतार आदी



वाद्यांच्या ताफ्यासह गातोय. मन्नादांना तेवढीच उत्तम साथ शिवदयाल बतिश या कलाकाराची आहे. हा भाग अप्रतिम झाला आहे. स्वतः रोशन उत्तम दिलरुबा वाजवत. दिलरुबा, बासरी, सारंगी, सतार या वाद्यांच्या अतिशय प्रेमात होते. त्यामुळे उत्तम वाद्यांचा मेळ वापरला आहे.

दुसरा भाग मोहम्मद रफींच्या हळुवार मखमली आलापात उलगडत जातो. या भागात.. इलाज कोई तो मौत है.. या शब्दांनंतर आशाबाईंनी जो आलाप घेतला आहे तो अवर्णनीय. आलाप नसून शहनाई वाजते आहे असं वाटावं इतका कर्णमधुर स्वर. इथे कव्वाली थोडं वेगळं वळण घेते.. ये इश्क इश्क

पान ७ वर


GOLDEN GATE TO IIT
"Making your dreams come true since 2005"
- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals:** Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice:** Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development:** Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch

Abhishek Mungekar IIT Gandhinagar; Anokhi Mehta IIT Bombay; Mihir Dharap IIT Palakkad

Our Top Scorers : 2019 Batch

Shreyas Nadkarni IIT Bombay; Om Prabhu IIT Bombay; Atharva Varde IIT Guwahati; Omkar Nadkarni IIT Madras

Our Faculty

Prof. Vinayak Antarkar B.Tech IIT Bombay — Mathematics
Prof. Manoj Karmarkar M.Tech IIT Bombay; Prof. Indraneel Naik M.Tech NIT Trichy — Physics
Dr. U.R. Kapadi Ph.D. IIT Bombay; Prof. Sudhanshu Mishra B.Tech NIT Rourkela — Chemistry

Contact: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
Address: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

MUSLUNKAR JEWELLERS PVT. LTD.
SILVER

We Known for Purity & Variety.
1. Trendy Jewellery & Articles Are Available.
2. Fashionable Jewellery For Youth, Men, Women.
3. We Offer Indo-Western Silver Jewellery.
4. All Festival Jewellery & Articles Are Readily Available.
7715097901 / 9619620907
Ram Mandir, M.G Road, Vile Parle East, Mumbai 400057

पान ६ वरून **नातो कारवांकी तलाश है**



है.. च्या गजरात साहीर साहेबांच्या लेखणीचा कस लागला आहे. चौफेर फिरली आहे ती. उर्दू, पारसी, ब्रज, हिंदी, पंजाबी.. सगळ्या भाषांमध्ये.. तसेच तत्त्वज्ञान, धर्म, अल्लाह, कुरआन, राधाकृष्णाचं प्रेम, गौतम बुद्ध, मसीहा.. या सगळ्यांना स्पर्श करून जाते. अमनच्या..जब जब कृष्ण की बन्सी बाजी.. निकली राधा सजके.. या ओळींबरोबर अमनला शोधत येणारी शबनम.. कलावती, बहार, दरबारी, खमाज या रागांमधुन पुढे सरकणारी कव्वाली.. संपूर्णपणे कव्वालीत रंगून गेलेले कलाकार.. त्यांच्या मागे बसलेले सहाय्यक कलाकार.. वादक.. वेग कायम ठेवत केलेले शूटिंग. हा चित्रपटाचा क्लायमॅक्स आहे. संपूर्ण श्रेय दिग्दर्शक पी. एल. संतोषी यांचे. जबरदस्त टेक. मुबारक अली मुकाबला जिंकतात. घरच्यांचा विरोध मावळून प्रेमी जीवांचं मिलन होतं आणि पुन्हा एकदा मल्हाराच्या सरींमध्ये चित्रपट संपतो. चित्रपट संपल्यानंतर आपल्या मनात रेंगाळत राहाते ती कव्वाली आणि प्रीतीच्या पहिल्या स्पर्शाने फुलून आलेली, मुझे मिल गया बहाना तेरे दीद का गाणारी सौम्य, देखणी शमा आणि तिला आनंदाने ढोलक वर साथ करणारी बहीण शबाब. मुख्य नायक-नायिका भारत भूषण आणि मधुबाला यांऐवजी शमा झालेली शामा भाव खाऊन जाते. तिच्या बरोबर शबाब झालेली रत्ना भारत भूषण.

सलग १९ तास या कव्वालीचं रेकॉर्डिंग चालू होतं. सर्व कलाकारांच्या जल्लोषात रेकॉर्डिंग संपलं. त्यानंतर उत्स्फूर्तपणे मन्नादा म्हणाले, चलो फिरसे एक बार गाते हैं ! सर्व वादकांनी पुन्हा एकदा आपली वाद्यं जुळवली. गायक पुन्हा एकदा पुढे सरसावले आणि पुन्हा एकदा कव्वाली गायली गेली. मध्यरात्री उशिरापर्यंत मैफिल रंगत गेली..



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

# डॉ. सुभाष दळवी ह्यांचा विशेष सन्मान

'गुरुदक्षिणा फाउंडेशन' च्या वतीने नुकताच डॉक्टर सुभाष दळवी यांचा एक विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात



आला. मूळ बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असणारे डॉ. दळवी ह्यांना महाराष्ट्र राज्याच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे प्रमुख समन्वयक म्हणून नुकतेच नियुक्त करण्यात आले. सदर सन्मान सोहळा त्याच निमित्ताने आयोजित करण्यात आला होता.

मूळ विलेपार्ले निवासी असणाऱ्या डॉक्टर दळवी यांना विलेपार्ल्याचेच आमदार पराग अळवणी यांच्या शुभहस्ते या निमित्ताने सन्मानित करण्यात आले. त्यावेळी मंचावर सुप्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर, माजी नगरसेवक अभिजीत सामंत आणि कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक मोहन भिडे आदी मंडळी उपस्थित होती.

१९९७ साली पहिल्यांदा नगरसेवक झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कामकाज पाहताना डॉक्टर दळवीं सारखा सर्व कामांमध्ये हिरीरीने भाग घेणारा अधिकारी पाहून आनंद झाला आणि नक्कीच ही व्यक्ती एक वेगळा ठसा उमटवणार हे त्याचवेळी लक्षात आल्याचे प्रतिपादन आमदार अळवणी यांनी या निमित्ताने बोलताना केले.सचिन खेडेकर यांनी अशा अधिकाऱ्यांच्या सोबत सदैव उभे राहण्याची इच्छा बोलून दाखवली तसेच अभिजीत सामंत यांनी डॉक्टर दळवीं सारखे अधिकारी सोबत असले की काम करायला हुरूप येतो आणि अर्थातच काम देखील उत्कृष्ट प्रतीचे होते असे गौरव उद्गार यानिमित्ताने काढले.

डॉक्टर दळवी यांनी त्यांचं हे कार्य म्हणजे एक वसा आहे आणि तो त्यांच्या समवेत सर्वच समाजाने घेतला तरच आपला महाराष्ट्र हा स्वच्छ होईल हा विश्वास बोलून दाखविला आणि त्याचबरोबर महाराष्ट्र व पर्यायाने मुंबई देखील स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांना प्रतिज्ञाबद्ध केले.

डॉक्टर दळवी यांच्यावर प्रेम करणाऱ्या समाजातील अनेक व्यक्तींच्या सहभागाने हा सन्मान सोहळा संपन्न झाला. सुविख्यात गायक जयदीप बगवाडकर यांनी किशोरदांची एकाहून एक अप्रतिम गाणी ह्या निमित्ताने सादर करून रसिकांच्या मनाला आनंद दिला. संगीत संयोजन हे अमेय ठाकूरदेसाई यांचे होते तर औपचारिक सोहळ्याचे निवेदन विनीत श्रीकांत गोरे यांनी केले.



# रंगुनी रागांत साऱ्या

## पहाडी

हा संध्याकाळी गायला आणि वाजवला जाणारा राग ख्याल गायकीत विशेष आवडीचा नाही. विशेष चीजा नाहीत पण instrumental मध्ये खूप लोकप्रिय. एखाद्या हिरवळीवर शेळ्या चरताहेत, बर्फाच्छादित डोंगर, निळे आकाश दिसताहेत, छोटा ओढा खळखळ करतो आहे, गार वारा असल्यामुळे ऊन्हात बसणे छान वाटते आहे आणि गाणे ऐकू यावे 'नीला आसमान सो गया'. पाठोपाठ शिवकुमार शर्मांचे संतूर आणि हरिप्रसाद चौरासियांची बासरी हाच तो पहाडीचा खराखुरा मूड. सिलसिलामधील हे गाणे या रागाचे लक्षणगीत मानायला हवे. अतिशय रोमँटिक, मृदू, प्रेमळ अशी असंख्य गाणी तुमच्या चरणी पेश करणारा हा राग बऱ्याच वेळा थोडी सुरांबाबत मोकळीक घेऊन, मिश्र अश्या अवतारात येतो आणि 'मूड' बनवतो. वानगीदाखल थोडी गाणी. 'वादिया मेरा दामन', बहारो मेरा जीवन भी सवारो', 'कभी कभी मेरे दिलमे', 'करवटे बदलते रहे सारी रात हम', 'फुलोंके रंगसे दिलकी कलमसे', 'कोरा कागज था ये मन मेरा'. पूर्वीच्या काळी हिरो हिरोईन फार जवळ येत नसत (चित्रपटात), त्यावेळी दोन फुले एकमेकांना चिकटतात असे दाखवायचे. प्रेक्षक सुज्ञ होते आणि त्यांच्याकडे कल्पना शक्ती होती अशावेळी हा राग असला कि घाणेरीची फुले सुद्धा चालायची. मूड महत्वाचा.

एक नितांत सुंदर गाणे सर्व मुलींना आपल्या प्रियकराने म्हणावेसे वाटायचे 'चौदवीका चांद हो या आफताबहो' वहिदा रेहमान छान दिसल्ये. 'दो सितारोंका जमीपर है मिलन आजकी रात' अशी प्रेमाची यशस्वी जीत किंवा, 'जो वादा किया वो निभाना पडेगा' असा प्रेमळ हट्ट यात खुलतो.

काही sad, विरही गाणी आहेत पण थोडीच अपवाद म्हणून 'लगजा गले' हे मदन मोहनचे cult song हे गाणे आजही नीट गाता आले तर competition मध्ये पहिला नंबर नक्की. आणखी 'रुलाके गया सपना मेरा', 'रहे न रहे हम', 'तुम मुझे भूलभी जाओ' वगैरे अर्थात ही सुद्धा अप्रतिम.

मराठी मध्ये थोडीच पण अतिशय सुंदर गाणी आहेत पहाडीत. 'केशवा माधवा तूझ्या नामातरे गोडवा' रागामुळे गोडवा गाण्यात पण उतरतो लगेच. 'लाजून हासणे अन हासून ते पहाणे' हे गाणे कितीही वेळा ऐकलं तरी अजून इतक्या वर्षांनी आवडते, मूड आनंदी होतो. एक विलक्षण गाणे आहे, ते माझ्या मित्राने (नितिन आखवे) लिहिले म्हणून नाही पण एक अतिशय आशयगर्भ गाणे. मुलीच्या लग्नाच्या आधी तिच्या मनात येणाऱ्या तरल आनंदी, औत्सुक्य, लाज आणि रोमँटिक मूडचे यथार्थ दर्शन. नितिन मनस्वी आणि वेगळाच कवी होता. लवकर गेला बिचारा, थोडीच गाणी पण अस्सल २४ कॅरट सोने एकेक. श्रीधर फडके यांनी स्वरबद्ध केलेलं आणि आशाताई नी उंचीवर नेलेलं. 'फुललेरे क्षण माझे फुललेरे'. पहाडीच्या मूडचा न विसरता येणारा अविष्कार. नितिनची आठवण कायम ठेवणारी 'ती शकुनाची मेंहदी'.

गझल या प्रकारात बहुतेक वेळा प्रेमभंगच झालेला असतो शायरचा. पण काही रोमँटिक गझला गुलाम अली यांनी अजरामर केल्या, अर्थात राग पहाडी. शायर म्हणतो कि 'त्याच दिल नाजुक आणि चोट नयी है अभी' पण 'दिलमे एक लेहेरसी उठी है अभी, कोई ताजा हवा चली है अभी' अश्या मूडला पहाडी राग चपखल, मैफिल आनंदी होते. असो.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

## डॉ. कौस्तुभ गोंधळेकर यांचा सन्मान

डॉ. कौस्तुभ द्वारकनाथ गोंधळेकर हे गेली १० वर्षे सौर उर्जा आणि उर्जा संवर्धन या क्षेत्रात कार्यरत आहेत. या क्षेत्रात त्यांनी बरेच नवनवीन प्रयोग करुन अनेक शोध लावले आहेत आणि त्यामुळे भारतात आणि भारताच्या बाहेर अनेक संस्थाना किती तरी उर्जा रोज वाचवता येते.

त्यांच्या या अविरत कार्यासाठी आणि योगदानासाठी त्यांना या आधी देखील भारतात आणि विश्वभरात अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

या वर्षी २५ मार्च २०२३ रोजी त्यांना यासाठी अमेरिकन काउन्सिल फॉर ट्रेनिंग एंड डेवलपमेंट, न्यू जर्सी, USA, इंस्टिट्यूट ऑफ एंट्रेप्रेनरशिप एंड मैनेजमेंट, मिनिस्ट्री ऑफ स्मॉल एंड मीडियम एंटरप्राईजेस (MSME), आणि नीति आयोग दर्पण (भारत सरकार) कडून मानदडॉक्टरेट' (honoris causa) - Honorary Doctorate in Business Management and Technology प्रदान करण्यात आली आहे.

त्याचबरोबर त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना २५ मार्च २०२३ रोजी 'भारत अभिमान पुरस्कार' पण प्रदान करण्यात आला.



मंगल प्रभात लोढा (Minister - महाराष्ट्र सरकार), उषा मंगेशकर, राज पुरोहित (पूर्व MLA), बिट्टा जी (ऑल इंडिया अँटी टेरॅरिस्म स्क्वाड प्रमुख) या मान्यवरांकडून डॉ. कौस्तुभ गोंधळेकर यांचा गौरव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे करण्यात आला.



# केमाक्ली आणि इजिप्तमधील ख्रिश्चानिटी

देशोदेशी

मी या आधीच्या लेखात म्हटलं होतं की टर्की आणि इजिप्त मध्ये प्रवास केल्यावर ख्रिश्चानिटीच्या तेथील प्राचीन पाऊलखुणांनी मला फार बुचकळ्यात टाकलं होतं. आज जरी तो संपूर्ण प्रदेश (इस्राएलचा अपवाद सोडून) इस्लामचा अनुयायी असला तरी ख्रिश्चानिटीच्या सुरुवातीच्या इतिहासातील अनेक महत्वाच्या घटना, युरोपमध्ये त्याचा सर्वदूर प्रसार होण्याआधी, ह्याचं भागात घडल्या. तो सर्वच इतिहास इथे सांगणं कठीण आहे. आज आपण त्यातील दोन महत्वाच्या पाऊलखुणा पाहू - एक टर्कीमधील आणि दुसरी इजिप्तमधील.



चौथ्या शतकाच्या सुरुवातीला रोमन सम्राट कॉन्स्टंटाईनच्या फतव्यानुसार ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांचा छळ बंद होऊन ख्रिश्चानिटीच्या प्रसाराचा मार्ग रोमन साम्राज्यातील प्रदेशांत (इटली, टर्की, सीरिया, लेव्हन्ट इत्यादी) मोकळा झाला होता. अर्थात तरीसुद्धा मूळ रोमन धर्माचे पाठीराखे आणि ह्या नवीन धर्माचे चाहते ह्यांच्यातील तेढ



आणि प्रसंगी मारामाऱ्या, कापाकाप्या संपल्या असं नाही. ह्या सुरुवातीच्या काळात संख्याबळ पाठीशी नसल्यामुळे असेल कदाचित पण टर्कीच्या दऱ्याखोऱ्यात अनेक नव-ख्रिश्चन समुदायांनी अवघड जागी गुहा-गुफेत किंवा जमिनीखाली भुयारांचं जाळं खणून त्यात आश्रय घेतला. त्यांच एक उदाहरण (गोरेमीच्या गुहा) आपण ह्या आधीच्या लेखात पाहिलं.

केमाक्लीचं भूमिगत शहर हे (गोरेमीपेक्षाही थक्क करणारं) आणखी एक उदाहरण. केमाक्लीची स्थापना नक्की कधी झाली त्याबद्दल बरीच वेगवेगळी मतं आहेत. ख्रिस्त-पूर्व ७०० वर्षांपूर्वी फिरजियन टोळ्या ह्या जागी तुरळक गुफा खणून त्यात राहत होत्या असा सर्वसामान्य समाज आहे. परंतु काही लोकांच्या मते त्याही आधी इ.स.पू. १२०० मध्ये हिट्टाईट लोकांनी येथे जमिनीखाली आपली घरं खोदली होती. अर्थात एक गोष्ट नक्की - त्या तुरळक गुहांच्या समूहाचं एकसंध आणि कित्येक पातळ्यांवर 'जमिनीखाली खोल जाणारं शहर' मात्र चौथ्या शतकांनंतर ख्रिश्चनधर्मियांनी बांधलं. आतापर्यंत पुरातत्व शास्त्रज्ञांनी केमाक्लीच्या भुयारांत ८ पातळ्या शोधून काढल्या आहेत, २०० फुटांपेक्षाही अधिक खोल जाणाऱ्या.

त्यापुढील एक हजार वर्षांपेक्षा अधिक काळ हे शहर सतत ३००० पेक्षा जास्त लोकांचं घर आणि आश्रयस्थान होतं - प्रथम मूळ रोमन धर्माच्या अनुयायांच्या छळापासून स्वत:ला वाचविण्यासाठी, नंतर बिझन्टाईन काळात येथे होणाऱ्या अरब सैन्याच्या स्वाऱ्यांपासून आणि नंतर चौदाव्या शतकात आलेल्या तिमूरच्या मंगोल सैन्यापासून संरक्षण करण्यासाठी, तसंच जवळ-जवळ विसाव्या शतकापर्यंत येथे राज्य करत असलेल्या ऑटोमन सत्तेच्या छळापासून सुटका व्हावी म्हणून.



मात्र ह्या इतिहासापेक्षाही जास्त जाणून घेण्यासारखं आहे, केमाक्लीचं चकित करणारं स्थापत्य. एखाद्या गावात लागणाऱ्या सर्व सोई शेकडो फूट जमिनीखाली इथे होत्या - घरं, प्रार्थनास्थळं, सभामंडप, अगदी दारूचे गुत्ते सुद्धा. त्याकाळात उजेडासाठी किंवा रोजच्या



स्वयंपाकासाठी फक्त लाकूड, तेल किंवा तत्सम पदार्थ जाळणे हा एकाच मार्ग होता, त्यातून निर्माण होणाऱ्या धुरामुळे आतले लोक गुदमरून मेलेच असते. पण एवढ्या हजारो लोकांना श्वासोच्छवासासाठी लागणारी शुद्ध हवा पुरवणे आणि आतील दूषित हवेचा निचरा करणे ह्याची केमाक्लीमधील व्यवस्था थक्क करणारी आहे. हवा खेळती ठेवण्यासाठी अनेक जमिनी पर्यंत जाणारे उभे मार्ग ठिकठिकाणी

पान १० वर






पान ९ वरून

## केमाक्ली आणि इजिप्तमधील ख्रिश्चानिटी

खोदलेले आहेत आणि तेही अश्या चातुर्याने की वर अगदी शहराच्या डोक्यावर उभ्या असणाऱ्या माणसाला सुद्धा ते सहजी नजरेत येऊ नयेत. त्याशिवाय पाणीपुरवठा, शहरात साचणाऱ्या घाण / कचऱ्याची विल्हेवाट असे अनेक प्रश्न - जे जमिनीवरच्या शहरांत सुद्धा सोडवणे आव्हानात्मक असतं ते केमाक्लीमध्ये तर आणखीनच कठीण असणार. पण शहराच्या रचनाकारांनी ह्या सर्वांची उत्तरं शोधली होती (त्याच्या खुणा आपल्याला दिसतात). **पहा पहिले ४ फोटो** (चर्च, दारू गाळण्याची फॅक्टरी, धान्याची कोठारं, भुयारातील वाटा) - पण नुसते फोटो बघून केमाक्लीची पूर्ण कल्पना येणं अशक्य आहे, प्रत्यक्ष त्या भुयारातील भूलभुलैयामधून वाट शोधत फिरल्याशिवाय.

मात्र इजिप्त मधला ख्रिश्चानिटीचा प्रवास टर्कीच्याही आधीच सुरु झाला होता असं दिसतं. ४२ सालीच संत मार्कने इजिप्तला येऊन प्रथम अलेक्झांड्रियामध्ये चर्च स्थापलं आणि धर्म प्रसाराला सुरुवात केली होती.

परंतु ४२ साल सुद्धा फार नंतरची गोष्ट झाली असं अनेक आख्यायिकांचं म्हणणं आहे. स्वतः मेरी, बाळ जीझसला घेऊन, त्यांच्या पाठलागावर असलेल्या रोमन सैनिकांची नजर चुकवत आश्रयाला इजिप्तला आली होती. नाईल नदीच्या काठाने उलटा सुलटा प्रवास **(ह्या प्रवासाच्या कथित मार्गाचा नकाशा पहा पाचव्या फोटोत)** करून शेवटी आजच्या कैरोमधील अबू सेगा चर्चच्या खालच्या गुहेत त्यांना आसरा मिळाला. आणि रोमन सैनिकांनी कंटाळून पाठलाग सोडून दिल्यावर ती दोघे परत जेरुसलेमला गेली, अश्या काहीश्या ह्या आख्यायिका आहेत. ज्या गुहेत ती दोघं राहिली त्याचा हा **सहावा फोटो.** हे जर खरं असेल, तर इजिप्त मधील ख्रिश्चानिटीचा इतिहास हा जवळ जवळ ख्रिस्त-जन्मापासूनच सुरु झाला असं म्हटलं




पाहिजे.

हे अबू सेगा चर्च आणि 'लटकतं' चर्च म्हणून प्रसिद्ध असलेलं पण देवाची आई संत मेरीचं इजिप्तच्या बाबिलॉन मधील चर्च' अश्या



लांबलचक नावाचं चर्च इजिप्तमधील सर्वात प्राचीन ख्रिश्चन प्रार्थनास्थळ मानली जातात (संत मार्कने स्थापलेल्या पहिल्या शतकातील अलेक्झांड्रिया मधल्या चर्चची मूळ इमारत आज अस्तित्वात नाही). मुळातील बाबिलॉनचा किल्ला म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका रोमन गढीच्या अवशेषांवर हे चर्च उभं केलेलं आहे. त्याला 'लटकतं' म्हणण्याचं कारण म्हणजे चर्चचं मुख्य सभागृह त्या रोमन गढीतील जाण्या-येण्याच्या मुख्यमार्गावर अधांतरी बांधलेलं आहे. ह्या लटकत्या' चर्चची रचना फार पाहण्यासारखी आहे **(पहा**




**सातवा फोटो)**. एकाबाजूने वेगवेगळ्या काळात बांधलेले बांधकामाचे थर, त्याच्या खोलातील पुरातन पाया पासून आजच्या चर्च **(आठवा फोटो)** पर्यंत स्पष्ट ओळखता



येतात.

ही गढी नक्की कधी आणि कोणी बांधली ह्याबद्दल मात्र अनेक वाद आहेत. जेंव्हा रोमन सेनांनी इजिप्तच्या प्राचीन राजसत्तेचा पराभव करून आपलं राज्य स्थापन केल तेव्हा हा मूळ किल्ला बांधला असा एक समज आहे. तर दुसऱ्या कथेप्रमाणे फॅरो सेसोस्ट्रीस (किंवा सेनुस्रेत) ह्याने पुरातन बाबिलॉन बरोबरच्या लढायात धरून आणलेले कैदी ठेवण्यासाठी ही गढी बांधली. पण तिसरी कथा अशी आहे की सत्य ह्याच्या बरोबर उलटं आहे. बाबिलॉनचा राजा नेब्यूकाडनझर ह्याने इजिप्तच्या सेनेचा पराभव करून पकडलेले कैदी ठेवण्यासाठी हा तुरुंग बांधला. जे काही असेल ते - पण अशा पुरातन प्रार्थनास्थळांच्या भोवती ख्रिश्चन धर्म प्राचीन इजिप्त मध्ये वृद्धिंगत राहिला तो सातव्या शतकात खलिफा रशिदच्या सैन्याने इजिप्तमधील रोमन सत्तेचा पाडाव करेपर्यंत.

आजही या मूळ इजिप्शियन ख्रिश्चन (कॉप्टिक ख्रिश्चन) समाजाचे वंशज इजिप्तमध्ये पुष्कळ आहेत. खरंतर ख्रिश्चन धर्माच्या टर्की आणि इजिप्तमधील इतिहासाचा शोध घेण्याची कल्पना सुद्धा माझ्या डोक्यात आली ती इजिप्तमधील कार्नाकचं देऊळ पाहून परत येताना आमच्या टॅक्सी चालकाबरोबर झालेल्या बोलण्यामधून. तो दिवस होता ख्रिसमसचा. टॅक्सीत बसल्याबरोबर चालक मागे वळून आम्हाला 'Merry Christmas' म्हणाला. इजिप्तसारख्या मुस्लिम देशात ही नवलाईची गोष्ट होती म्हणून मी चौकशी केली तर तो निघाला कॉप्टिक ख्रिश्चन - विस्मरणात गेलेल्या पिढ्यांपूर्वीपासून ख्रिश्चन असलेल्या कुटुंबातला. त्याने सांगितलेल्या दंतकथांतून माझं कुतूहल जागृत झालं आणि मग कैरो/अलेक्झांड्रियाला गेल्यावर वर वर्णन केलेल्या स्थळांना आम्ही भेट दिली!



**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा वर्धापन दिन संपन्न

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ही मुंबईकरांच्या वाचन संस्कृतीचा आधारस्तंभ असलेली सव्वाशे वर्षांची मान्यताप्राप्त संस्था. दि. २ मार्च २०२३ रोजी या संस्थेच्या विलेपार्ले शाखेचा ५५वा वर्धापन दिन उत्कर्ष मंडळ सभागृहात दिमाखात संपन्न झाला.

दर्जेदार ग्रंथालय हे नेहमी साहित्यिक, प्रकाशक आणि वाचक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा बनून काम करत असते. त्यालाच अनुसरून साहित्यविश्वातील जाणकारांची मनोगते, पुस्तक प्रकाशन, कथाकथन आणि साहित्य पुरस्कार असे या सोहळ्याचे उचित स्वरूप ठेवण्यात आले होते.

सुप्रसिद्ध कथाकार आणि मौज'च्या संपादिका श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या तर ज्येष्ठ साहित्यिक श्री. अशोक बेंडखळे यांनी अध्यक्षपद भूषवले. या प्रसंगी श्री.रविराज गंधेलिखित 'भिरभिरं' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.







लेखकाने नेहमी स्वतःला आनंद मिळेल आणि आपले कौशल्य पणाला लागेल अशी साहित्यनिर्मिती करावी. वाचकांच्या प्रतिसादाचे दडपण घेऊ नये आणि समाजमाध्यमांवर सतत पोस्टस लिहित राहण्यापेक्षा थोडं थांबून, गांभिर्याने लेखनाच्या दर्जाकडे लक्ष केंद्रित करावे अशा आशयाचे उद्गार श्रीमती गजेंद्रगडकर यांनी काढले. कथा या साहित्यप्रकाराविषयी त्यांनी मार्मिक भाष्य केले. 'भिरभिरं' या पुस्तकातील विविध लेखांविषयीदेखिल त्यांनी सविस्तर विवेचन केले. दूरदर्शनवर निर्माते म्हणून दीर्घकाळ कार्यरत असणाऱ्या रविराज गंधे यांनी आपल्या 'भिरभिरं' या पुस्तकाच्या निर्मितीविषयी प्रेक्षकांशी संवाद साधला.



साहित्यविषयक अनेक संस्थांशी जवळून संबंध आणि संपादकीय क्षेत्राचा गाढा अनुभव असलेल्या श्री. अशोक बेंडखळे यांनी आपल्या मनोगतात साहित्यनिर्मितीमध्येही ग्रंथालयांचा किती मोलाचा सहभाग असतो याचे दाखले दिले. तसेच शाखेतर्फे सुरू झालेल्या 'पार्ले साहित्यिक कट्टा' विषयीदेखील माहिती दिली.




पान १३ वर

# ‘सूप्स आणि सॅलड्सची’- वाट आरोग्याची

विलेपार्ल्याचा ईशान आंबर्डेकर लहानपणापासूनच आई मेधा आंबर्डेकर आणि ताई (शिल्पा आंबर्डेकर/वाटवे) स्वयंपाक कसा करतात? पदार्थ सजवून पाहुण्यांचं आदरातिथ्य कसं करतात? हे पाहात होता. त्यालाही त्यात रूची होती. मग सुरुवातीला त्या त्याला सॅलडची तयारी करायला देऊ लागल्या परंतु पुढे याच सॅलड्समधून आपल्याला व्यवसाय सापडेल असं काही त्याला वाटलं नव्हतं.




मोठेपणी ईशानने हॉटेल मॅनेजमेंट शिकल्यावर विलेपार्ल्यातील ऑर्किड हॉटेलमध्ये अडीच वर्षे नोकरीही केली. पण मग त्याला स्वत:चा व्यवसाय काढावा असं वाटू लागलं. तेव्हा शिल्पाताईने सुचवलं की तू सॅलड्सचाच व्यवसाय का नाही करत? ती संकल्पना आवडून ईशान या व्यवसायात उतरला.

२७ जुलै, २०१५ रोजी त्यानं आईसोबत ‘ग्रीन प्लॅटर’ हा संपूर्ण शाकाहारी सूप्स-सॅलड्सचा व्यवसाय सुरू केला. आज दादरपासून बोरिवलीपर्यंतच्या ग्राहकांना तो घरपोच सेवा देतो. रोजचे शंभरहून अधिक नियमित ग्राहक असूनही पदार्थांचा घरगुती ‘टच’ त्यानं सोडलेला नाही. पथ्याचेच पदार्थ लागणारे, वजन कमी करू इच्छिणारे, करियरमुळे घरी सॅलड्स करायला वेळ नसणारे लोक त्यात आहेत. त्याशिवाय नैमित्तिक ग्राहकही असतातच. पार्ल्यातील आहारतज्ज्ञ डॉ. गीतांजली चितळेंच्या सल्ल्याने पदार्थ कमी कॅलरींचे तरीही आरोग्यपूर्ण होतील याकडे ते लक्ष देतात. शिवाय मेधाताईंनी इंदिरा गांधी विद्यापीठाचा न्युट्रिशनचा अभ्यासक्रम केला आहे त्याचाही लाभ होतो. मध्यंतरी एका आर्किटेक्टला रोज वेगवेगळ्या साईटवर ईशानने सूप आणि सॅलड पुरवलं होतं.ईशानचे आजोबा रामचंद्र लोंढे लग्नांची कंत्राटे घ्यायचे तर आजी शैला सुगरण होत्या. तीच कला मेधाताई आणि ईशान यांच्यात उतरली आहे. त्यामुळे सूप-सॅलड स्वादिष्ट करण्याची जादूच या मायलेकांना गवसली आहे असं म्हणता येईल. मेधाताई म्हणतात की मुलासोबत व्यवसाय करायला मिळाल्याने माझ्यातील सुप्त गुणांनाही वाव मिळाला. पारंपरिक रेसिपी आणि ईशानच्या नव्या रेसिपी यांचा संगम झाल्यानेच ग्राहक संतुष्ट होतात. शिवाय आम्ही ऋतुमानानुसारच पदार्थ वापरतो, ताज्या भाज्या वापरतो, एकही पदार्थ महिन्याभरात रिपीट होणार नाही याची काळजी घेतो.



मध्यंतरी त्यांनी सॅंडविचेस ठेवायला सुरुवात केली होती, सध्या विविध रॅप्स (मैदा विरहित), कटलेट्स इत्यादी पदार्थ ते देऊ लागले आहेत. चटका मेरी, रेनबो सॅलड, मॅंगो मूड अशी कल्पक नावेही ईशान या पदार्थांना देतो. निवेदिता सराफ, मधुरा वेलणकर, ऋजुता देशमुख, मिलिंद इंगळे, डॉ. रश्मी फडणवीस यांनी या पदार्थांना सदैव पसंती दिली आहे. ईशानची पत्नी अपूर्वा नोकरी करूनही त्याच्या व्यवसायाचे हिशोब ठेवते. व्यवसायात आईचा सक्रिय पाठिंबा आहेच परंतु वडील प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ शेखर आंबर्डेकर यांचेही प्रोत्साहन सदैव मिळाले असं तो नमूद करतो.



**सविता दामले**
९९३०३ ११५४६

# सेक्सटॉर्शन

मी पार्लेकर असून नुकताच पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेलो आहे पोलीस खात्तील माझ्या अनुभवाच्या आधारावर सर्वसाधारण जनतेला जागृत करण्याच्या दृष्टीने मी हे सदर चालू केलेले आहे. याद्वारे आपणास सत्य घटनांच्या विवरणावरून बोध घेऊन आलेल्या संकटापासून बचाव कसा करायचा याचे मार्गदर्शन करण्याचा प्रामाणिक हेतू आहे.

सध्याच्या काळामध्ये खूपच प्रचलित झालेली गुन्ह्याची पद्धत म्हणजे सेक्सटॉर्शन (SEXTORTION).

या पद्धतीच्या गुन्ह्यामध्ये आरोपी हे पीडित व्यक्तीच्या लैंगिक बाबी समाज माध्यमाद्वारे सार्वजनिक करण्याची धमकी देऊन पैसे उकळतात या गुन्हे कार्यप्रणालीला म्हणजेच मोडस ऑपरेंडिला सेस्क्टॉर्शन असे संबोधण्यात येते. कोविड प्रदुर्भावादरम्यान जी अनेक संकटे आली त्यापैकीच हे एक संकट आहे असे म्हणता येईल. त्या काळामध्ये विलगीकरणामुळे बऱ्याच घरांमध्ये पुरुष मंडळी विशेषत: ज्येष्ठ नागरिक एकटे राहत होते. त्या संधीचा फायदा घेऊन काही वेबसाईटने इंटिमेट चॅटिंग आणि व्हिडिओ कॉलिंग द्वारे लैंगिक भूक भागवण्याच्या हेतूने हे प्रकार सुरू केले होते. पुढे काही समाजकंटकांनी या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन हे इटिमेट चॅटिंग अथवा इंटरनेट व्हिडिओ कॉलिंग हे रेकॉड करून ते समाज माध्यमांमध्ये प्रसारित करायची धमकी देऊन संबंधित व्यक्तीकडून खूप मोठ्या प्रमाणावर पैसे उकळलेले आहेत एवढेच नाही तर काही घटनांमध्ये पीडित व्यक्तीने प्रतिष्ठा पणाला लागली म्हणून आत्महत्या केल्याची उदाहरणे देखील आहेत.

**आता आपण या गुन्ह्याची कार्यप्रणाली समजावून घेऊयात**







फेसबुकच्या पेजवर मेसेंजर माध्यमातून अनोळखी मुलगी अथवा स्त्री पीडित व्यक्तीबरोबर चॅटिंग करण्यास सुरुवात करते सर्वसाधारणपणे जी व्यक्ती समाजामध्ये प्रतिष्ठित आहे ज्येष्ठ नागरिक आहे अशा व्यक्तीच्या फेसबुक मेसेंजरद्वारे एक मेसेज पाठवून चॅटिंगला सुरुवात केली जाते. तसेच त्या पीडित व्यक्तीच्या फेसबुक फ्रेंड लिस्ट मधील व्यक्तींची माहिती हे गुन्हेगार गोळा करतात. त्यामुळे पीडित व्यक्तीचे नातेवाईक जवळचे मित्रमंडळी याबाबत त्यांना माहिती मिळते. सुरुवातीचे चॅटिंग सर्वसाधारण स्वरूपाचे असते त्यानंतर जाणून बुजून रात्री उशिराने ती स्त्री चॅटिंग सुरु करते संबंधित पीडित व्यक्ती जर मद्य प्राशन करणारी असेल तर नेमके त्याच काळामध्ये ती स्त्री इंटीमेट चॅटिंगला सुवात करते. त्या सावजाकडून अपेक्षित प्रतिसादात मिळू लागताच ती स्त्री तिचा फोन नंबर देते किंवा सावजाचा फोन नंबर मागते त्यानंतर प्रथम व्हाट्सअप द्वारे चॅटिंग करून नंतर व्हिडिओ कॉल करते. व्हिडिओ कॉल चालू होताच सदर स्त्री तिच्या अंगावरील एकेक कपडा काढून नग्न होते आणि समोरा व्यक्तीला देखील तसे करण्यास उद्युक्त करते हे सर्व संभाषण आणि व्हिडिओ कॉल एका ॲपद्वारे रेकॉर्ड केला जातो किंवा दुसऱ्या फोनद्वारे रेकॉर्ड केले जाते. थोड्याच वेळात ती स्त्री आपले रूप पालटते आणि खरे रूप दाखवते ते रेकॉर्डिंग ज्यामध्ये अश्लील संभाषण अश्लील चाळे रेकॉर्ड केलेले असतात ते त्या व्यक्तीला पाठवते आणि ते सर्व व्हिडिओ रेकॉर्डिंग समाज माध्यमाद्वारे प्रसारित करण्याची धमकी देऊन प्रथम छोट्या रकमेची मागणी केली जाते. मागणी केलेली रक्कम छोटी असल्याने पीडित व्यक्ती ती रक्कम देण्याच्या मनस्थितीत असतो. ती रक्कम प्राप्त होताच पुन्हा अधिक रकमेची मागणी केली जाते. त्याची पूर्तता न केल्यास अश्लील संभाषणाचे रेकॉर्डिंग पीडित व्यक्तीच्या फेसबुक फ्रेंड लिस्ट मधील एखाद्या व्यक्तीला पाठवले जाते. सहाजिकच तो पीडित व्यक्तीला तात्काळ संपर्क साधतो आणि त्याची माहिती देतो त्यामुळे पीडित व्यक्ती अधिकच घाबरून जातो आणि त्यांच्या पैशाची मागणी पूर्ण कराण्याचा असफल प्रयत्न करीतो परंतु आरोपींचेी मागणी कधी संपतच नाही शेवटी नाईलाजाने त्याला पोलिसांकडे धाव घ्यावी लागते अशा घटनांमध्ये पीडित व्यक्तीने अब्रू नुकसानीच्या भीती पोटी लाखो रुपये दिल्याचे उदाहरणे आढळून आलेली आहेत काही प्रसंगी पीडित व्यक्तीने आत्महत्या देखील केलेली आहे.

एखादी पीडित व्यक्ती कणखर निघाल्यास आणि त्याने पैसे देण्यास नकार दिल्यास त्याला दिल्ली पोलीसांचा युनिफॉर्म घातलेला व्यक्तीच्या फोटोचा डीपी असलेल्या मोबाईल वरून फोन येतो आणि तो दिल्ली येथील पोलीस अधिकारी असल्याचे बतावणी करून संबंधित महिलेने त्यांच्याकडे तक्रार केली आहे असे सांगतो आणि पीडित व्यक्तीला पोलीस ठाण्यास पाचारण करतो तेव्हा मात्र त्या व्यक्तीचे अवसान गळून जाते आणि तो पैसे देण्यास तयार होतो.

**या अनुषंगाने अशा गुन्ह्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने खालील मुद्यांचा अवलंब करावा**

१ फेसबुक द्वारे कोणाही अनोळखी स्त्री अथवा मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये तिच्यासोबत फेसबुक मेसेंजरद्वारे चॅटिंगला प्रतिसाद देऊ नये.

२ एखादी व्यक्ती यामध्ये फसली असल्यास त्याने कोणत्याही परिस्थितीत आरोपींनी

पान १२ वर

पान ११ वरून **सद्रक्षणाय**

कितीही छोट्या रकमेची मागणी केली असेल तरी त्याची पूर्तता करू नये.

३ सर्वप्रथम घरातील मंडळींना विश्वासात घ्यावे आणि तात्काळ पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करावी.

४ पोलिसांच्या मदतीने सायबर तज्ञांची मदत घेऊन आपले फेसबुक अकाउंट आणि इतर समाज माध्यमातील अकाउंट यावर इतर कोणालाही कोणताही संदेश पोस्ट करता येणार नाही असे सेटिंग करून घ्यावे जेणेकरून आरोपी हे पीडित व्यक्तीची बदनामी करू शकणार नाही.

५ अशा संकटाला धैर्याने तोंड देणे हे कधीही चांगले पीडित व्यक्तीचे मनोबल ढासळल्यास आरोपीचा निश्चितच फायदा होतो.

६ सर्वसाधारणपणे आरोपी हे आठ ते दहा दिवस पीडित व्यक्तीचा पाठपुरावा करतात परंतु त्यानंतर दुसऱ्या सावजाच्या मागे लागतात असे आढळून आलेले आहे अर्थात याला अपवाद असू शकतो

तेव्हा मित्रांनो सेक्सटॉर्शन जाळ्यात फसू नका आणि फसलात तर धैर्याने तोंड द्या हाराकिरी पत्करू नका... Stitch in time saves nine

जय हिंद..



**(अविनाश धर्माधिकारी)**
निवृत्त पोलीस उपअधीक्षक
महाराष्ट्र पोलीस, मो. न. ९९३०६८५८३१

# औदुंबर

औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळासांवळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.

चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे.

पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.

झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर;
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर

- बालकवी


बालकवी ठोंबरे यांची ही कविता आम्हाला S. S. C. ला होती. त्या काळी पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या शाळेत मला वाटतं माझा वर्ग सर्वच विषयांच्या बाबतीत खास करून भाषांच्या आणि अगदी खास करून मराठीच्या शिक्षकांच्या बाबतीत फारच सुदैवी होता. ९वी,१०वी, ११वी ला अनुक्रमे पेठे बाई, आपटे बाई ( विनय आपटेंच्या मातोश्री ), व सहस्त्रबुद्धे सर हे भाग्य खरंच स्वतः:चाच हेवा करायला लावणारं या शिक्षकांनी लावलेली मराठी साहित्याची व कवितांची गोडी आजही कायम आहे ती त्यांच्या समर्पित वृत्तीमुळे व शिकविण्याच्या अप्रतिम हातोटीमुळे. त्या गोडीमुळे आजही धकाधकीच्या आयुष्यात आनंदाचा झरा झुळूझुळू वाहतोय. त्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तेवढे थोडेच.

ही कविता व हे सगळं आठवण्याचं कारण म्हणजे प्रतिभाशाली कवी वैभव जोशी यांनी स्पृहा जोशी बरोबरच्या मुलाखतीत या कवितेचं केलेलं विश्लेषण नुकतंच माझ्या पाहण्यात आलं. वर-वर पाहता ही कविता निसर्ग वर्णनाची वाटते पण वैभव जोशीनी त्याच एका वेगळ्याच पातळीवर केलेलं विलक्षण विश्लेषण अंतर्मुख करतं. ऐलतट व पैलतट म्हणजे जीवन व मृत्यू. त्यांच्या मधून जीवनाची हिरवाळी लेवून, परमेश्वराच्या कृपेची निळाई जीवनाच्या चार आश्रमांच्या सहाय्याने ( चार घरांचे गाव चिमुकले ) बेटा-बेटातून म्हणजेच माणसा-माणसातून वाहते व यात माणसाला जीवनाच्या प्राक्तन रेषे बरहुकूम वाटचाल करायची असते ( पायवाट पांढरी तयातून अडवी तिडवी पडे ) आणि सगळं भोगून मृत्युच्या काळ्या शार डोहाचा स्वीकार, त्यात पाय सोडून बसलेल्या निर्विकार औदुंबरा प्रमाणे स्तितप्रज्ञतेने करायचा असतो. असे हे विश्लेषण म्हणजे तर जीवनाचे नितांत सुंदर तत्वज्ञानचं झालं.

पण आमच्या सहस्त्रबुद्धे सरांचा अन्वयार्थ याहून थोडा वेगळाच होता. निळा सावळा झरा त्यांना घनश्याम कृष्णा सारखा भासला. तो पुरुषोत्तम चारही वेदांबरहुकूम ( चार घरांचे गावं चिमुकले), जीवनाच्या अनेक कसोटी घेणाऱ्या प्रसंगात ( बेटाबेटातून ) चारही पुरुषार्थ गाजवत जीवनाचं साफल्य असलेल्या काळ्या नितळ डोहाकडे वाटचाल करतोय. डोहाच्या लाटा वर पसरलेला गोड काळिमा हा ऐहिक सुखांचा आहे. म्हणूनच तो एकाच वेळी गोड पण काळा आहे परंतु या वरवरच्या लोभस आणि तकलादू आवरणाला भेदून त्या खालील निर्मळ जीवनाच्या सारातच पाय सोडून औदुंबर बसलाय. पांढरी पायवाट ही गोऱ्या राधेचं प्रतीक. निळ्या सावळ्या कृष्णाच्या प्रेमात आकंठ बुडालेली ती त्याला साथ करण्याकरिता धडपडते आहे. त्याच्या बरोबरीने वाटचाल करते आहे. पण कितीही झालं तरी ती एक विवाहित स्त्री. त्या काळच्या सामाजिक कसोटी प्रमाणे एक अभिसारिका. म्हणूनच अनेक सामाजिक बंधनं, उपहास याचे अडथळे यांनी तीची वाटचाल अडवीतिडवी'आहे. आणिहीसारी, चारही वेद किंवा आश्रम यांना चिमुकलं भासायला लावणारी अजोड व विराट प्रेमकहाणीचा साक्षीदार होऊन, साक्षात ब्रम्हरूप जगंन्नीयता, जीवनाच्या कृतार्थतेत पाय सोडून स्थितप्रज्ञतेने ध्यानस्थ बसला आहे. बरं रूपक म्हणून औदुंबरच का? एखादा प्रचंड वटवृक्ष किंवा अश्वत्थ का नाही? कारण औदुंबर हे त्रिगुणात्मक त्रिमूर्तीचं अधिष्ठान (Trinity). ज्ञानाचं प्रतीक. हे असं सगळं!!!

अरे बापरे!! मला अजून आठवतंय की वर्गातले आम्ही सगळे थक्क होऊन, डोळ्याची पापणही न लववता, कान टवकारून, तासभर हे विवेचन भान विसरून ऐकत होतो. तो मराठीचा S. S. C. चा पेपर, त्यातील तो १० मार्कांचा कवितेच्या रसग्रहणाचा'प्रश्न व त्यासाठी या खास वर्गाचा खटाटोप, हे सर्व मी विसरूनही गेलो. जणूकाही दीड वितीची पोटाची खळगी भरण्यासाठी शेत नांगरताना मला पिढ्यानंपिढ्याची ददात मिटविणारा सोन्याच्या नाण्यांनी भरलेला हंडाच सापडला होता.

असं म्हणतात की अभिजात कलाकृती ही अनेक पदरी असते, तिचे अनेक अन्वयार्थ असू शकतात व ते सर्वच चपखलपणे लागू होऊ शकतात पण सध्या माझ्यातल्या सामान्य कविता प्रेमीला एवढच म्हणावसं वाटतंय की हा सोन्याच्या नाण्यांचा हंडा मित्र मंडळीना , रसिक जणांना वाटताना त्यात आता वैभव जोशी यांच्या हिऱ्या माणकांचीही भर पडलीय.



**प्रसाद आठल्ये**
९८२०६ १३४४५

# उर्मी

मनोरंजक कथा, खुसखुशीत संवाद आणि उत्तम स्टारकास्ट असलेल्या 'उर्मी' हा चित्रपट १४ एप्रिलपासून सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.'उर्मी' या चित्रपटात नाती, प्रामाणिकपणा, विश्वास, प्रेम, मैत्री हे बिंदू जोडत एक उत्तम कथा साकारली आहे. पती-पत्नी यांच्या नात्यात आलेल्या तिसऱ्या व्यक्तीमुळे काय घडते ? असं चित्रपटाचं कथासूत्र आहे. नायकाचं वैवाहिक आयुष्य सुरळीत सुरू असताना आधीची प्रेयसी नायकाच्या आयुष्यात बाळासह परतते आणि तिचा दावा असतो की जन्माला आलेलं बाळ नायकाचंच आहे. आता नायकाच्या प्रामाणिकपणावर शंका घेण्यापासून अनेक प्रश्नचिन्ह निर्माण होतात. पुढे काय होतं, यासाठी तुम्हाला 'उर्मी' हा चित्रपट पाहावा लागेल. समृद्धी क्रिएशननं 'उर्मी' चित्रपटाची प्रस्तुती केली आहे तसेच डॉ. प्रवीण चौधरी चित्रपटाचे निर्माते आहेत आणि चैताली प्रवीण चौधरी सहनिर्माती आहेत.राजेश जाधव यांनी चित्रपटाचं पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन केलं आहे.

विजय गटलेवार आणि उत्पल चोधरी यांचे संगीत असून, अनंत कामत यांनी संकलन, कौशल गोस्वामी यांनी छायाचित्रणाची जबाबदारी निभावलीय. चित्रपटात अभिनेत्री रसिका सुनील, सायली संजीव अभिनेता चिन्मय उदगीरकर, नितीश चव्हाण, माधव अभ्यंकर, सायली पराडकर, तृप्ती देवरे, संतोष शिंदे अशी उत्तम स्टारकास्ट असून ऋतुजा जुन्नरकर पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत आहे.

**मनोरंजन विश्व**




# घर, बंदूक, बिर्यानी

एप्रिल महिन्यात बहुचर्चित असा 'घर बंदूक बिर्यानी' चित्रपट प्रदर्शित होत आहे. मुळात नागराज मंजुळे आणि झी स्टुडिओजने मराठी सिनेसृष्टीला नेहमीच हटके चित्रपट दिले आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरवरून खूप उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने नागराज मंजुळे आपल्याला ॲक्शन मोडमध्ये आणि एका वेगळ्याच शैलीत दिसत आहेत तर सयाजी शिंदेही अतिशय तडफदार अंदाजात दिसत आहे. आकाशची रोमॅंटिक इमेजही तरुणांना भावणारी आहे. ट्रेलरमधील लक्ष वेधून घेणाऱ्या गोष्टी म्हणजे पार्श्वसंगीत आणि अभूतपूर्व ॲक्शन. ट्रेलरवरून हा एक ॲक्शन चित्रपट असल्याचे कळत असले तरी यात कौटुंबिक कथाही दडली आहे. यात प्रेमकहाणीही बहरत आहे. चित्रपटाबद्दल निर्माते नागराज पोपटराव मंजुळे म्हणतात, ''अतिशय भव्यस्वरूपात हा चित्रपट आता प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. दिसताना खूप ओळखीचा विषय दिसत असला तरी याची कथा खूप वेगळी आहे. मी पडद्यामागे आणि पडद्यावरही काम केले आहे. अनेकांना प्रश्न होता की या चित्रपटाचे नाव असे काय ? तर या चित्रपटाचे नाव अतिशय समर्पक असून ते चित्रपट पाहिल्यावरच प्रेक्षकांना कळेल.''

चित्रपटाचे दिग्दर्शन हेमंत अवताडे यांनी केले असून आकाश ठोसर आणि सायली पाटील यांच्या मुख्य भूमिका असणारा हा चित्रपट नक्कीच यशस्वी होईल असे वाटते.






**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

## हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

श्री जय हनुमान व्यायाम शाळा, रामवाडी या संस्थेमार्फत प्रतिवर्षी साजरा होणारा श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दिनांक ६ आणि ७ एप्रिल असा दोन दिवसीय उत्सव साजरा



करण्यात आला. यंदा संस्थेचे ६८ वे वर्ष असल्याने उत्सवाच्या पहिल्या दिवशी हनुमान जन्मोत्सव व सत्यनारायण महापूजा तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते तसेच दुसऱ्या दिवशी भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या दोन दिवसीय सोहळ्याला हजारो भाविकांनी उपस्थिती दर्शविली असून तब्बल ५००० भाविकांनी हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ घेतला. 'राम सेतू देखावा' हे सोहळ्याचे विशेष आकर्षण होते.

गेल्या ६८ वर्षांपासून विलेपार्ले तसेच मुंबई उपनगरात नावाजलेल्या संस्थांमध्ये जय हनुमान व्यायाम शाळा, रामवाडीचे नाव गणले जाते. संस्थे मार्फत प्रतिवर्षी अनेक सामाजिक उपक्रम देखील राबवले जातात. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर, गरजू होतकरू मुलांना अल्पदरात वह्या वाटप या सारखे उपक्रम गणेश उत्सवात येथील हेडगेवार मैदानात संपन्न होतात तसेच हजारो गणेश मूर्तीच्या विसर्जनाची सेवा देखील संस्थेचे कार्यकर्ते गेली १४ वर्ष विनामूल्य करत आहेत. कोरोना काळात देखील संस्थेमार्फत मोफत अन्नदान केले जात होते.


''श्री जय हनुमान व्यायाम शाळा, रामवाडी या आमच्या संस्थे मार्फत प्रतिवर्षी साजरा केला जाणारा हनुमान जन्मोत्सव सोहळा यंदाही



भक्तिपूर्ण वातावरणात पार पडला. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही संपूर्ण पार्लेकरांनी या सोहळ्याचा आनंद लुटला. दरवर्षी आपल्या संस्थेमार्फत हनुमान जन्मोत्सव सोहळ्या व्यतिरिक्त देखील वर्षभर अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रातील उपक्रमांचे आयोजन केलं जातं.'' असे संस्थेचे सचिव सिद्धेश चंद्रकांत पवार यांनी सांगितले.

## म्युझिक थेरपी मध्ये डॉक्टरेट

पं. शशांक कट्टी यांचा एक श्रेष्ठ सतारवादक आणि संगीतकार म्हणून संगीत विश्वाला चांगलाच परिचय आहे. तसेच ते एक इलेक्ट्रिकल इंजिनियर पण आहेत. आपले गुरू नानामहाराज तराणेकर यांच्या आशीर्वादाने गेली २६ वर्षे ते संगीत उपचार या विषयावर अभ्यास करत आहेत. हिंदुस्थानी संगीताच्या सुरांमधे विकारांना



बरे करायची शक्ती आहे या ठाम विश्वासाने ते न्युरो साउंड टेक्नॉलॉजी, आयुर्वेद, आणि सुरांच्या गुणधर्मांची सांगड घालून विविध विकारांवर उपचार करत असतात. त्यासाठी त्यांनी 'सुर संजीवन' या नावाने संगीत उपचाराचे एक नवीन शास्त्र विकसित केलं. तसेच सुरांचे वैद्यकीय परिणाम साधण्यासाठी त्यांनी वेगळे नियम वापरून रागांच्या ऐवजी सुरावलींची निर्मिती केली.

त्यांच्या समोर संगीतोपचाराची परिणामकारकता प्रत्यक्षात योग्य ठरवण्याचं एक मोठं आव्हान होतं. त्यासाठी शशांकजींनी विविध व्याधींच्या रुग्णांवर अनेक प्रयोग केले. संधीवात, मधुमेह, अस्थमा, लठ्ठपणा, कंपवात, एपिलेप्सी, सिझोफ्रेनिया अशा विकारांवर त्यांच्या उपचारांना अनुकूल परिणाम मिळत गेले. त्यातून त्यांचे उपचार योग्य असल्याचं सिद्ध झालं आहे. कोविड झालेल्या रुग्णांच्या शक्तीपात, अकाली जन्मलेल्या बाळांच्या वजन नियोजन इत्यादी समस्यांचे संगीत उपचाराने निराकरण हे त्यांनी साध्य केले आहे.

नुक्तीच पंडितजींच्या या संशोधनाची दखल 'वर्ल्ड पीस इन्स्टिट्युट ऑफ युनायटेड नेशन्स' या आंतरराष्ट्रीय संस्थेने घेतली आणि त्यांना त्यांच्या २५ वर्षांच्या एकसंध लोकोपयोगी कामगिरीबद्दल 'Doctrate in Music Therapy' प्रदान केली. या बहुमानाचा आदर करून गुरुकृपेने या संगीत उपचार पद्धतीचा उपयोग मानवाला निरोगी आणि आनंदी करण्याची डॉ. शशांक कट्टी यांची मनीषा आहे.




पान १० वरून

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा वर्धापन दिन संपन्न

**ज्या लेखकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यांची नावें पुढील प्रमाणे**

**चरित्र विभाग -**
प्रथम क्रमांक - डॉ.अरुण निगवेकर
द्वितीय क्रमांक - डॉ.सुधीर मोंडकर
तृतीय क्रमांक - मोगल जाधव

**संशोधन विभाग**
प्रथम क्रमांक - डॉ.वृंदा कौजलगीकर
द्वितीय क्रमांक - डॉ.विशाखा कांबळे
तृतीय क्रमांक - डॉ.मृदुला बेळे

**कादंबरी विभाग -**
प्रथम क्रमांक - प्रा.शशिकांत कुगांवकर
द्वितीय क्रमांक - अशोक भेलके
तृतीय क्रमांक - स्मिता भागवत

**कविता संग्रह -**
प्रथम क्रमांक - हबीब भंडारे
द्वितीय क्रमांक - स्वाती पाटील
तृतीय क्रमांक - मेगमेहेन

**संकीर्ण विभाग -**
प्रथम क्रमांक - राजेंद्र रासकर
द्वितीय क्रमांक - डॉ.मंजूषा कुलकर्णी
तृतीय क्रमांक - रमेश पतंगे

**कथा विभाग**
प्रथम क्रमांक - संतोष शिंत्रे
द्वितीय क्रमांक - प्रतिभा कणेकर
तृतीय क्रमांक - विठ्ठल गावस

**प्रवास वर्णन**
प्रथम क्रमांक - मेधा आलकरी
द्वितीय क्रमांक - अनिल दामले
तृतीय क्रमांक - विष्णू पावले-

**समीक्षा विभाग**
प्रथम क्रमांक - डॉ.उत्तम पठारे
द्वितीय क्रमांक - डॉ.अभिजीत पाटील आणि लक्ष्मण साके
तृतीय क्रमांक - सुधीर रसाळ

**बाल साहित्य -**
प्रथम क्रमांक - रमेश तांबे
द्वितीय क्रमांक - एकनाथ आव्हाड
तृतीय क्रमांक - रंजना सानप

**ललित लेख विभाग -**
प्रथम क्रमांक - हिमांशू स्मार्त
द्वितीय क्रमांक - अनुराधा नेरुरकर
तृतीय क्रमांक - विलास पाटील